# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७/12400 दि. 08/09/2017

**महत्वाचे व अति तात्काळ**

परिपत्रक

विषयः **१०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिपची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलमार्फत सन २०१७-१८ साठी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ: मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक उशिसं-२०१७/सीएसएस/शिष्यवृत्ती/१०६१३, दि.०७.०९.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय संदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी /मार्च २०१७ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इयत्ता १२वी मध्ये) कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त (२०$^{th}$ Percentile Merit List) विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेमध्ये महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. सदर योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नवीन तसेच प्रथम व व्दितीय नुतनीकरण (Fresh, 1st & 2nd Renewal) हे अर्ज ऑनलाईन पध्दतीने व तृतीय व चतुर्थ नुतनीकरण (3$^{rd}$ & 4$^{th}$ Renewal) करिता ऑफलाईन पदधतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

- **नवीन तसेच प्रथम व व्दितीय नुतनीकरण (Online Process):**

१. नवीन तसेच प्रथम व व्दितीय नुतनीकरण (Fresh, 1$^{st}$ & 2$^{nd}$ Renewal) हे अर्ज ऑनलाईन पध्दतीने http://scholarships.gov.in या वेबसाईट वरुन करणे आवश्यक आहे.

२. ज्या विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile Merit List मध्ये समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांना नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल. सदर विद्यार्थ्यांची यादी मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधार क्रमांक हा त्याच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.

४. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र इत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

५. **नवीन मंजूरीसाठी (Fresh Application) अर्ज करण्याचा अंतिम दि.३१.१०.२०१७ असून प्रथम व द्वितीय नूतनीसाठी (1$^{st}$ & 2$^{nd}$ Renewal Application) अर्ज करण्याचा अंतिम दि.३०.०९.२०१७ आहे.** तसेच ऑनलाईन अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या सी.एस.एस. शिष्यवृत्तीबाबत सूचनांचे अवलोकन करावे.

६. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय/संस्थेने छाननी करुन त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत, अंतिम मुदतीची वाट पाहू नये.

- **शिष्यवृत्तीचे नूतनीकरण(Offline Process):**

१. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी तृतीय व चतुर्थ नूतनीकरण (3rd & 4th Renewal) साठी आवश्यक असणारा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाउनलोड करावा व परिपूर्णरित्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दि. २०.१०.२०१७ पर्यंत जमा करावा.

३. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तसेच विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडलेल्या Excel Sheet मध्ये कोणताही बदल न करता दि. २५.१०.२०१७ पर्यंत संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.

४. महाविद्यालयांनी संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयास विहित मुदतीत अर्ज व विद्यार्थ्यांची यादी सादर न केल्याने व संबंधित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती रक्कम न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१७-१८ च्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य/संस्थाप्रमुख यांची असेल. तरी सर्व अधिनस्त महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी त्यांच्या महाविद्यालयांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी संबंधित प्राचार्य / विभागप्रमुख यांनी सदर शिष्यवृत्तीचा **तपशील तसेच पोस्टर आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनीय सूचना फलकावर लावून** सदर योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

सदर योजना ही Direct Benefit Transfer (DBT) योजने अंतर्गत येत असल्याने मंजूर रक्कम ही थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. त्यामुळे प्राचार्यांनी वैयक्तीक लक्ष घालून विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक त्यांचे बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. ते लिंक झालेले नसल्यास सदर विद्यार्थ्यांस त्याचा आधार क्रमांक बँक खाते क्रमांकाशी लिंक करण्याबाबत कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे बँक खात्याची माहिती जसे **A/c No., Bank Name, Branch Name, IFCS व MICR Code तसेच चालू असलेला मोबाईल क्रमांक** इत्यादी बिनचूक व परिपूर्ण भरावी.

RBhosle
8/9/12

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,कोकण विभाग, पनवेल.

प्रति,

१. प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व अशासकीय अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये, जि.ठाणे, पालघर,रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई

प्रतः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहितीस्तव सादर.